महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६२ वा | दिनांक : २७/०३/२०२५ | वार : गुरूवार

## भारतीय राज्यघटना कुणाकडून उसनी आणलेली नाही - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत संविधानातील चर्चेत सहभागी होऊन आपले मत मांडले. यावेळी त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे समाजात मोठे परिवर्तन झाल्याचे स्पष्ट केले. संविधानाला धोका नाहीये. धोका झाला होता, तो आता संपलेला आहे. पुढील निवडणुकांसाठी नवीन काही तरी मुद्दा काढा, नवीन नरेटीव्ह तयार करा, दुसऱ्या गोष्टींवर आपली ऊर्जा खर्च करावी, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लगावला. दरम्यान, ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या भाषणाचे कौतुक करण्यात आले. तसेच या भाषणाचे एक पुस्तक प्रकाशित करण्याची विनंती ठाकरे गटाकडून करण्यात आली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारताचे संविधान हे १०-१२ देशांच्या संविधानातील गोष्टींपासून तयार झाल्याचा आरोप करतात. पण तसे नाही. हे पूर्णतः भारतीय तत्वांवर तयार करण्यात आलेले संविधान आहे. संविधान सभेमध्ये भारताच्या ध्वजावर चर्चा सुरू होती, तेव्हा राधाकृष्णन म्हणाले, जोवर आपण सद्गुणांवर चालत नाही, तोवर आपण पवित्रतेचे ध्येय साध्य करू शकत नाही किंवा सत्यही गाठू शकत नाही. अशोक चक्र हे कायद्याचे व धर्माचे चक्र आहे. सत्य गाठायचे असेल तर धर्माच्या वाटेनेच जावे लागेल. त्यामुळे या ध्वजाखाली जो काम करेल, सत्य व धर्म त्याचे आचरणाचे तत्व असले पाहिजे.

धर्म हे सातत्याने पुढे जाणारे गतिमान असे चक्र आहे. यापूर्वीच्या काळात आपल्याला जो त्रास सहन करावा लागला, तो बदलांना प्रतिकार केल्यामुळे... आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत. काळाच्या बरोबरीने चालण्याचे धैर्य आपण दाखवले नाही तर आपण मागे राहू. जात, अस्पृश्यता हे जोपर्यंत आपण त्यागत नाही, तोवर आपण सत्य व सद्गुणांचा वारसा सांगू शकत नाही. हे चक्र आपल्याला हेच सांगते की, एका ठिकाणी थांबलो की एकेठिकाणी थांबलो तर मृत्यू आहे, ते चक्र सतत फिरत राहिले तर तिथेच जीवन आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

१९४६ मध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळ एका निर्णायक वळणावर पोहोचली, तेव्हा इंग्रजांनी कॅबिनेट मिशन पाठवले. त्या कॅबिनेट मिशनने रिपोर्ट दिला की स्वातंत्र्य भारताचे संविधान तयार करावे लागेल. त्यावेळी संविधान सभा निर्माण करण्याचा निर्णय झाला. १९३५ चा कायदा हा एक प्रकारे संविधान होते. पण ते इंग्रजी राज्य चालवण्यासाठी भारतीय लोकांचा सहभाग असावा यासाठी होते. ते आपण संविधानात परावर्तित केले नाही. संविधानाने एकएक आर्टिकलवर चर्चा केली आहे. मग स्वीकार केला आहे. १६५ दिवस ही चर्चा झाली. ९ डिसेंबर १९४६ रोजी पहिली चर्चा तर २४ जानेवारी १९५० रोजी शेवटची चर्चा झाली. तीन वर्षे हे काम सुरु होते. जगाच्या पाठीवर सर्वात प्रदीर्घ काम ज्या संविधान सभेने काम केले ती ही भारताची संविधान सभा होती. ३८९ सदस्य यामध्ये होते. ९ डिसेंबर १९४६ ला पहिले अधिवेशन झाले. तेव्हा सुरुवात ही वंदे मातरम् गीताने झाली. आचार्य कृपलानी यांनी पहिले भाषण केले होते. एकट्या बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुतांश ड्राफ्ट तयार केला. म्हणून संविधानाचे शिल्पकार हे बाबासाहेब आंबेडकरांना मानतो, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.




## सोमनाथ सूर्यवंशी मृत्युप्रकरणाचा तपास CID कडे : कुटुंबीयांची उच्च न्यायालयात याचिका



**परभणी :** हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा न्यायालयीन कोठडी मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, सोमनाथ मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले होते. सव्वातीन महिन्यांनंतर आता सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

सोमनाथ सूर्यवंशी याचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार असला, तरी आम्हाला न्याय हवाय, अशी मागणी सोमनाथच्या कुटुंबीयांनी केली आहे. आता न्यायमूर्ती तेलगावकर यांच्या अहवालातही पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे .मात्र तरीही सरकार न्याय देत नाही .जे जे दोषी आहे तर त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. सोमनाथच्या कुटुंबीयांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे .जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत लढतच राहणार असल्याचे सोमनाथच्या आई आणि भावाने म्हटले आहे.

सूर्यवंशी हत्या प्रकरणी न्यायदंडाधिकाऱ्यांचा ४५१ पानी गोपनीय अहवाल राज्य मानवाधिकार आयोगासमोर सादर करण्यात आला. आयोगाने संबंधित सर्व पोलिसांना नोटीसा बजावून उत्तर मागितले आहे. मानवाधिकार आयोगाने याप्रकरणी राज्याचे मुख्य सचिव, गृह सचिव, अतिरिक्त पोलिस महासंचालक (गुन्हे), परभणी सीआयडीचे पोलिस उपअधीक्षक यांनाही नोटीस बजावली आहे. तर परभणी जिल्ह्यातील नवा मोंढा पोलिस ठाण्यात मारहाण करण्यात आली, असा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्यांच्या चौकशीतून काढला आहे.

सोमनाथचा मृत्यू श्वसनाच्या विकाराने झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. तसेच त्याच्या शरीरावरील जखमाही जुन्याच असल्याचे म्हटले होते. शवविच्छेदन अहवाल आणि न्यायदंडाधिकाऱ्यांचा अहवाल आल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सुधारित स्पष्टीकरण दिले. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या संदर्भात पोस्टमार्टमचा रिपोर्ट वेगळा आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट जेव्हा करतो तेव्हा व्हिसेरा बाजूला ठेवलेला असतो. हा रिपोर्ट वेगळा असतो. आता व्हिसेराच्या अंतिम अहवाल हातात आला आहे. व्हिसेरा रिपोर्ट आणि पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये वेगवेगळी माहिती समोर आली आहे' असे फडणवीस म्हणाले.

आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी रिपोर्ट दिले त्यांनी पोस्टमार्टमच्या रिपोर्टनुसार माहिती दिली आहे. जस्टीस अंचलिया समिती नेमली आहे. जर सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू संदर्भात पोलिस यांच्यामुळे मृत्यू झाला असेल, तर व्हिसेरा रिपोर्ट बाजूला ठेवूया, मागे पुढे न पाहता पोलिसांवर कारवाई केली जाईल. समितीने सांगितलं तर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ मार्च २०२५


# मातृतीर्थातील आप्पासाहेब मुळे यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान




**किनगावराजा (महेश मुंढे) :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार आप्पासाहेब मुळे यांना,माजी मंत्री आमदार अर्जुन खोतकर यांच्या शुभहस्ते देऊन सत्कार करण्यात आला.महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण दिनांक २३/०३/२०२५ रोजी जालना शहरातील पाठक मंगल कार्यालय या ठिकाणी भव्य दिव्य पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमांमध्ये आयोजन करण्यात आले होते.आप्पासाहेब शिवप्रसाद मुळे यांना मा आमदार अर्जुन भाऊ खोतकर, मा.आ नारायण कुचे, मा नगराध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख जालना चे भास्करराव आंबेकर, शिक्षणाधिकारी जी प कैलास दातखिळ, गटशिक्षणाधिकारी जालना डॉ.भरत वानखेडे, गटशिक्षणाधिकारी बदनापूर,डी एन क्षीरसागर, गटशिक्षणाधिकारी घनसांगी रवी जोशी, स महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद,संजय पगार, बाबुराव पवार कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद,मंगेश जवळ जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जालना यांसह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पुरस्काराचे वितरण जालना शहरातील पाठक मंगल कार्यालयात भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन करून पुरस्कार प्रदान करण्यात आला.आप्पासाहेब शिवप्रसाद मुळे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, शैक्षणिक क्षेत्रात विविध प्रकारे विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता,शारीरिक मानसिक या सर्व बाबींचा सर्वांगीण विकास कसा होईल उत्कृष्ट दर्जाची शिक्षण प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांमधील विकासात्मक धोरण राबवत अखंड परिश्रमाची दखल म्हणून त्यांचा योग्य तो सन्मान म्हणून गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी जालना तालुक्यातील त्यांची वर्णी लागली.त्यांनी त्यांच्या सेवेमध्ये अनेक उल्लेखनीय कार्य केले आहे.त्यामुळे त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली आहे त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा पात्र होऊन शिष्यवृत्तीसाठी जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये आलेले आहेत.तालुका आणि जिल्हास्तरावर विविध क्रीडा स्पर्धा मध्ये खो-खो,कबड्डी,धावणे,लांब उडी,रिले या स्पर्धेमध्ये तालुका व जिल्हास्तरावर त्यांचे विद्यार्थी विजेते ठरलेले आहेत. यामुळे अनेक विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या क्रीडा कौशल्याच्या आधारावर जालन्यातील क्रीडा प्रबोधनी या शाळेमध्ये झाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण,राहण्याचा खर्च त्या ठिकाणी मोफत केला जाणार आहे. जालना जिल्ह्यामध्ये अतिशय महत्वपूर्ण आणि कठीण समजली जाणारी प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यामध्ये विजेतेपद मिळवले आहे.कोविडच्या काळामध्ये स्वतः ऑनलाईन क्लास द्वारे मुलांना अध्यापन करून शिक्षणात खंड पडू दिला नाही.यामध्ये केवळ आपल्या शाळेचे नव्हे तर तालुक्यातील इतरही विद्यार्थी ऑनलाईन क्लासला द्वारे मोफत शिक्षण मिळावं म्हणून कोविड काळामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, कुठलाही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी नियमित ऑनलाईन क्लासेस घेऊन सर्व मुलांना त्यांचा अभ्यासक्रम त्या त्या काळात पूर्ण करण्यासाठी अविरतपणे आप्पासाहेब मुळेयांनी कष्ट घेतले आहे. या कार्याची दखल घेऊन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी या शैक्षणिक कामाबरोबर त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय कार्यक्रमांमधील सहभाग,त्यामध्ये दरवर्षी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ साहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करणे, त्यातून अनेक जणांना रक्तदान करण्यासाठी प्रेरित करणे, आणि स्वतः 21 वेळा रक्तदान करून एक आदर्श समाजापुढे निर्माण केला आहे.महापुरुषांची जयंती,पुण्यतिथी निमित्त गावोगावी व्याख्यान, प्रबोधन त्यामध्ये छ शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांच्या जयंती निमित्ताने डीजे,ढोल,ताशा न वापरता त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा जपण्यासाठी करावी म्हणून प्रबोधनाचे कार्य करीत आहेत.

भारतीय लोकशाही बळकट होण्यासाठी मतदारांमध्ये जन जागृती होण्यासाठी मतदार जनजागृती पथक प्रमुख म्हणून जालना तालुक्यात प्रत्येक गावामध्ये जाऊन लोकांना उपदेश केलेला आहे.त्यासाठी विविध पथनाट्याच्या माध्यमातून लोकांना ईव्हीएम ची माहिती करून दिली.एक उत्कृष्ट व्याख्याते वक्ते व सूत्रसंचालक अशी देखील त्यांची वेगळीच ओळख आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील,सिने अभिनेते सयाजीराव शिंदे यांनी त्यांचा सन्मान केला आहे.त्याचबरोबर जालना जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी जिल्हा निवडणूक कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट संचलन केल्याबद्दल उत्कृष्ट निवेदक म्हणून सन्मान केलेला आहे, याच बरोबर कीर्तनाच्या माध्यमातून लोकांमध्ये शिक्षण,अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन जालन्यातील अनेक सेवाभावी संस्थांनी विविध पुरस्कारानी यापूर्वीच त्यांना सन्मानित केलेले आहे.सामाजिक,शैक्षणिक राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने त्यांना २०२५ वर्षीचा गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे...त्यांच्या यशाबद्दल शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ,गटशिक्षणाधिकारी डॉ भरत वानखेडे,विस्तार अधिकारी प्रेरणा लोंढे , सर्व केंद्रप्रमुख शिक्षक, शिक्षिका या सर्वांकडून त्यांचे कौतुक होत आहे.






# दिग्रस येथील युवकाची धारधार शस्त्राने हत्या



**दिग्रस (महेश मुंढे) :** तालुक्यातील धानोरा बु. येथील शेत शिवारात एका २३ वर्षीय युवकाचा धारधार शस्त्रानी मानेवर व डोक्यावर खोलवर धाव घालून निर्घृणपणे खून करून विहिरीत फेकल्याची घटना मंगळवार २५ मार्च रोजी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान उघडकीस आली. शेख मुफित शेख मुस्ताक २३ रा.देउरवाडा पुनर्वसन असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. मृतक हा रोजमजुरीचे काम करीत होता. आज २५ मार्च रोजी धानोरा बु. येथील विलास किसन शेलकर यांच्या विहिरीत मृतकाच्या कमरेला दोर बांधून आढळला. विहिरीच्या काठावर रक्ताचा सडा दिसल्याने शेत मालक याने ही माहिती धानोरा बु. येथील पोलीस पाटील गोविंद गावंडे यांना दिली असता त्यांनी याबाबत पोलिसांना माहिती देताच घटनास्थळी दारव्हा उपविभागीय पोलीस अधिकारी चिलुमुला रजनीकांत व पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे सह पोलीस ताफा पोहचला. तेव्हा घटनास्थळी पाहणी केली असता विहिरीत मृतदेहाला दोरीने बांधून असल्याची पुष्टी विहिरीतील तरंगत असलेल्या पाण्यावर रक्ताचे थर दिसत असल्याने झाली. तेव्हा विहिरीतील पाणी मोटार पंपाने कमी करून बघितले असता मृतदेहाच्या कमरेला दोर बांधून आढळला तसेच त्यांच्या मानेवर धारदार शस्त्राचे दोन घाव व डोक्यावर एक घाव दिसला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला व खाटीला दोर बांधून मृतदेहाला बाहेर काढले. या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी पोलिसांनी फॉरेन्सिक, फिंगरप्रिंट, डॉग युनिट यांना पाचारण करण्यात आले.

या प्रकरणी दिग्रस पोलिसात मृतकाचा भाऊ फिर्यादी मो.नदीम शेख मुस्ताक रा. देऊरवाडा याने दिग्रस पोलिसात तक्रार म्हटले की, मृतकाचे मित्रांसोबत वाद झाला होता. या वादातून खून झाला असल्याने त्यांची चौकशी करण्याचे तक्रार नोंदवली आहे. मृतकाच्या पश्चात आई, वडील, ३ भाऊ, २ बहिणी असा परिवार आहे. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंद करून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी चिलुमुला रजनीकांत व पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे सह पोलीस तपास करीत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ मार्च २०२५

# तहसील कार्यालयात नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा : अखिल भारतीय छावा संघटनेची मागणी



**सिंदखेडराजा (महेश मुंढे) :** सिंदखेड राजा येथील तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी त्रिव संताप व्यक्त केला आहे.सिंदखेड राजा येथे कार्यालयीन कामासाठी नागरिक दूरचा प्रवास करून येत असतात,त्यात काही गावांचा विचार केला तर तालुक्यापासून बऱ्याच गावाचे अंतर ५० ते ६० किमी आहे.सध्या उन्हाचा पारा वाढला असल्याने शरीराला पाण्याची गरज असते, उष्णतेमुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत आहे.या सर्व गोष्टी महत्वपूर्ण नागरिकांशी निगडीत असल्यामुळे याचा विचार करून, नागरिकांसाठी तहसील कार्यालयात पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात यायला हवी होती परंतु झाली नाही आता तरी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा अशी मागणी छावा जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सहकाऱ्याच्या सह दैनिक विदर्भ दस्तक शी बोलतांना व्यक्त केली आहे.पुढे बोलतांना,तालुक्याच्या क्षेत्रफळाचा विचार जर केला तर,दूर वरून नागरिक कार्यालयासंबंधी कामे घेऊन येत असताना, तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे आहे, उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे तहसील कार्यालयात नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे,याकडे संबंधित तहसीलदार अजित दिवटे यांनी लक्ष देणे फार गरजेचे आहे.कारण पाणी हा शरीरासाठी महत्त्वाचा भाग असून,उन्हाळा लागल्यामुळे शरीराला पाण्याची जास्त गरज असते, सध्या उन्हाची दाहकता खूप भयंकर जाणवत आहे यामुळे नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी त्रस्त दिसत आहे.वृद्ध नागरिकांची पाण्याअभावी तहसील कार्यालयात गैरसोय होत असल्याचे छावा संघटनेच्या निदर्शनास आल्यामुळे तहसीलदार अजित दिवटे यांना निवेदनाद्वारे,भविष्यात निर्माण होणाऱ्या गंभीर बाबींवर लक्ष देऊन उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.बरेच दिवसापासून या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था संबंधित विभागा कडून न झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होताना जाणवले आहे.नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करणे फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन,नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न,जो निर्माण होत आहे तो प्राधान्यक्रमाने मार्गी लावावा या प्रकाराच्या प्रांजल जनहिताच्या भावना वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केल्या आहे. तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे बंधनकारक असते परंतु आता व्यवस्था न झाल्यास अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांसह दोन ते तीन दिवसात सिंदखेड राजा चे तहसीलदार यांच्याशी भेट घेऊन जाब विचारणार आहोत असे अशोक राजे जाधव यांनी सांगितले.

# पोलीस उपनिरीक्षक पदी निलेश सुर्वे यांची निवड



**वाशिम (महेश मुंढे) :** मंगरुळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथून जवळच असलेले आदर्श गाव लाठी येथुन निलेश गजानन सुर्वे यांची पोलीस निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल गावामध्ये जलोष करण्यात आला.अल्प शेतकरी असून उच्च शिक्षण देण्याची जिद्द आई-वडिलांची होती तशाच परिस्थितीत मोठ्या कसरतीने शिक्षणाला महत्व देऊन निलेश सुर्वे यांची जिद्द चिकाटी लक्षात घेता अभ्यासाला महत्त्व देऊन रात्र दिवस एक करून अनेक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पीएसआय पदी उच्चपदी निवड झाली तसेच गावात मोठ्या प्रमाणात जल्लोष व ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.समस्त गावकरी मंडळी तसेच समाजबांधव आजुबाजूच्या हितचिंतक परिवार यांच्या आशीर्वादाने हा घवघवीत यश संपादन केले त्याचेच हे फलित आहे अशा शब्दात निलेश सुर्वे यांनी आई वडिलांचे आशीर्वाद घेऊन सर्व जनतेने गौरव केला.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व चाचणीत भावेश साळवे, रोहन पवारचे यश



**कन्नड (अरुण थोरात):** जवाहर नवोदय विद्यालय कन्नड करीता प्रवेश पूर्व केंद्रस्तरीय चाचणी परीक्षेत ज्ञानविकास विद्यालय भराडीचा भावेश प्रदीप साळवे, आमठाणा येथील प्रज्ञा जागृती प्राथमिक शाळेचा रोहन सर्जेराव पवार या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.दोन्ही विद्यार्थ्यांना यापुढे सहावीपासून बारावीपर्यंतचे सी.बी.एस.ई.(सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन) पॅटर्नचे मोफत शिक्षण, राहण्याची सुविधा भावेशला केंद्र शासनाकडून मिळणार आहेत. जिल्ह्यातून सरासरी सोळा हजार विद्यार्थी या परीक्षेसाठी सहभागी होते, यातून 80 च विद्यार्थ्यांची निवड स्पर्धा परीक्षेतून करण्यात येते. यात भावेश साळवे व रोहन पवार ची निवड झाली. भावेश व रोहनच्या यशाबद्दल विद्यालयाचे प्रमुख तथा भाजपा तालुकाध्यक्ष अशोकदादा गरुड, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम .के. देशमुख, आर.डी.तांगडे, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, जयश्री चव्हाण, अरुणा भूमकर, उपशिक्षणाधिकारी भारत पालवे, अधीक्षक प्रदीप राठोड, सचिन शिंदे, गीता तांदळे, नीता श्रीश्रीमाळ, शिल्पा गरुड, चंद्रिका देशमुख, प्राचार्या सानवी देशमुख, संचालिका डॉ. सुनिता राठोड, दिलीप दांडेकर, सुनील पंडित, प्रदीप साळवे, सोनू साळवे, गटशिक्षणाधिकारी अनिल पवार, डॉ.प्रकाश मांटे, आर. व्ही.ठाकूर,आर. फुसे, डी. फुसे, दिलीप शिरसाट, जयेश चौरे, सुनिता वाघ, डॉ. संजय गायकवाड, कल्पना सरदार, राजेंद्र महाजन, समाधान साळवे, सुनील अदीक, सतीश देशमुख, आदित्य गरुड, सचिनदादा चौधरी, सर्जेराव पवार, सुवर्णा पवार, संदीप देशमुख, राम गरुड, योगेश देशमुख, कुशल देशमुख, कैलास रिंढे, कयूम शहा, भारत सुपेकर, वनिता बनबरे, सुभाष सरदार, अंकुश सोनवणे, जावेद पठाण, मुकेश पवार , बाळूभाऊ ईवरे, अतुल ठोंबरे, निवृत्ती ठोंबरे, जनार्दन ठोंबरे, विठ्ठल पुरी यासह ज्ञानविकास विद्यालयाचे शिक्षक वृंद, शालेय वाहनाचे चालक-मालक, पालक आदींनी अभिनंदन केले.

# कन्नड ग्रामीण रुग्णालयात पोस्टमार्टम मृत बॉडी सेफ्टी फ्रिजर ची मागणी



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड ग्रामीण घाटी रुग्णालय येथे बनशेंद्रा रोड या ठिकाणी एक्सीडेंट झालेले भोई समाजाचे दोन मुलं कन्नड घाटी रुग्णालय येथे मयत घोषित झाल्यानंतर त्यांना पोस्टमार्टम प्रक्रियेसाठी रात्रभर पोस्टमार्टम खोलीमध्ये ठेवण्याची वेळ आल्याने तसेच तीव्र उन्हाळ्याचे दिवस असल्याने त्या ठिकाणी मृत बॉडी सेफ्टी राहण्यासाठी कोणत्याही सुविधा नसल्याने मृत बॉडीची हिंसा थांबवण्यासाठी अखिल भारतीय भोई समाजसेवा संस्थेचे युवा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत लाडे यांनी मृत बॉडीसाठी, कन्नड ग्रामीण रुग्णालय घाटी मधील पोस्टमार्टम खोलीत फ्रीजरची व्यवस्था असणे गरजेचे आहे. जेणेकरून काही अनुचित प्रकार घडल्यास किंवा वादग्रस्त प्रकार असल्यास सदर बॉडी ज्यादा वेळ ठेवल्यास आलेल्या पेशंटच्या नातेवाईकांच्या भावना लक्षात घेता अनर्थ न होण्यासाठी पोस्टमार्टम खोलीमध्ये मोठ्या फ्रिजरची आवश्यकता ही काळाची गरज आहे अशी मागणी अखिल भारतीय भोई समाजसेवा संस्थेचे युवा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत लाडे यांनी केली. असून सदर समस्या आपल्या स्तरावरून तात्काळ मार्गी लावून जनतेस सहकार्य करावे अन्यथा या प्रश्नी आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला. याप्रसंगी भोई समाज मराठवाडा अध्यक्षा अनिता लाडे, भोई समाज तालुकाध्यक्ष पंकज बावणे, भोई समाज शहराध्यक्ष किशोर बनसोडे, गणेश वायडे, पवन बाविस्कर आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ मार्च २०२५

# नागसेनवनातुन सुरू होणार भीमजयंतीचा जल्लोष सलग ९ व्या वर्षी नागसेन फेस्टिव्हलचे भव्य आयोजन







छत्रपती संभाजीनगर : येथील नागसेनवनात भीमजयंतीच्या निमित्ताने नागसेन फेस्टिव्हलचे भव्य आयोजन करण्यात आले असून यंदा सलग ९ व्या वर्षी हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या वतीने १३४ व्या भीमजयंतीच्या निमित्ताने २८ ते ३० मार्च दरम्यान सायं.०५ ते १० या वेळेत हा महोत्सव रंगणार आहे.यंदाच्या नागसेन फेस्टिव्हलचे उद्घाटन जगप्रसिद्ध छायाचित्रकार आणि पद्मश्री पुरस्कार विजेते सुधारक ओलवे यांच्या हस्ते २८ मार्च रोजी सायं.०६ वाजता लुम्बिनी उद्यान येथे होणार आहे. फेस्टिव्हलच्या निमित्ताने कला, साहित्य, संगीत आणि विचारांच्या अद्वितीय संगमाचा अनुभव रसिकांना मिळणार आहे.नागसेन फेस्टिव्हलमध्ये विविध सांस्कृतिक आणि कलात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात कला संगीति, व्याख्यान, परिसंवाद, बहुभाषिक कवी संमेलन, भित्तीपत्रके, मुलाखती, भीमगीत नृत्य, आणि आंबेडकरी रॅप अशा विविध उपक्रमांची रेलचेल असणार आहे. नागसेन फेस्टिव्हलचे निमंत्रक सचिन निकम यांनी सांगितले की, "हा महोत्सव जगभरातील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी-माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणणारा एक सशक्त मंच ठरत आहे." या महोत्सवात ३० हून अधिक कलावंतांच्या विविध कलाकृतींचे प्रदर्शन होणार असून, प्रत्यक्ष कलाकृती निर्मितीचा अनुभवही रसिकांना मिळणार आहे. विविध प्रकारच्या पेंटिंग्ज, शिल्पकला आणि इतर माध्यमांच्या कलाकृती प्रेक्षकांना पाहायला मिळतील. नागसेन फेस्टिव्हल समितीने या महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे. "ही केवळ कला आणि साहित्याची पर्वणी नाही, तर विचारांचे आणि समतेच्या मूल्यांचे एक अनोखे विचारपीठ आहे," असे आयोजन समितीने स्पष्ट केले आहे.-

--सुधारक ओलवे यांचे फोटोग्राफी प्रदर्शन मुख्य आकर्षणनागसेन फेस्टिव्हलमध्ये यंदा सुधारक ओलवे यांच्या फोटोग्राफी प्रदर्शनाचे विशेष आकर्षण असणार आहे. शोषित आणि वंचितांचे वास्तव मांडणाऱ्या त्यांच्या छायाचित्रांची झलक प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. तसेच, प्रसिद्ध चित्रकार आणि अभिनेत्री शुभा गोखले यांच्या कलाकृतींची विशेष प्रदर्शनीही या फेस्टिव्हलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.सिनेअभिनेते कैलास वाघमारे यांची विशेष उपस्थिती यावेळी असणार आहे.---बहुभाषिक कवी संमेलन – विविध भाषांचा संगमया महोत्सवातील बहुभाषिक कवी संमेलन रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, वऱ्हाडी, अहिराणी, बंजारा आणि आदिवासी अशा विविध भाषांतील आंबेडकरी कविता कवी संमेलनात सादर केल्या जातील. देशभरातील नामवंत कवी आपली कविता सादर करून विचारांची नवी दिशा उलगडून दाखवणार आहेत.---कलासंगीति – कला आणि विचारांचा मंथनसोहळाकला, गीत, चित्रपट आणि नाटक या क्षेत्रातील दिग्गज कलाकार 'कलासंगीति' या विशेष परिसंवादात सहभागी होणार आहेत. लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचा जागर या परिसंवादात होईल. कलेच्या वाटचालीवर आणि चळवळीसाठी कलेच्या अपरिहार्यतेवर या मंथनात चर्चा केली जाणार आहे.---लोकशाही, समता आणि स्वातंत्र्याचा जागरभीमजयंतीचे औचित्य साधून नागसेन फेस्टिव्हलमध्ये लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य यांचा जागर घालण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव विविध कला आणि साहित्याच्या माध्यमातून लोकांसमोर मांडण्यात येणार आहे.

## "थॉयरॉईडला टाळा आनंदी जीवन जगा" - डॉ. ममता मुळे

छत्रपती संभाजीनगर : डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात आज दिनांक २५-३-२५ मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता थायरॉईड जनजागृती हा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाच्या आरोग्यवर्धिनी समितीकडून आरोग्य हाच खरा दागिना हा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. असे प्रस्ताविकात कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्राध्यापिका माधुरी भावसार यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुनिता बाजपाई मॅडम होत्या. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या मुख्य नोडल अधिकारी.. मिशन थायरॉईड.. डॉ. ममता मुळे 'औषध वैद्यक शास्त्र विभाग ' शासकीय वैद्यकीय रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमात थायरॉईडची लक्षणे आजाराचा प्रकार त्याचे शरीरावर होणारे गंभीर परिणाम व या आजाराकडे दुर्लक्ष केल्यास कॅन्सर सारखे आजाराला सामोरे जावे लागते असे आपल्या व्याख्यानातून त्यांनी अत्यंत तळमळीने सांगितले. थायरॉईड ची लक्षणे दिसल्यास त्यांनी त्वरित रक्ताची तपासणी करून उपचार सुरू करावे असे आवाहन त्यांनी केले. खडे मीठ व सेंधव मीठ यांचा वापर आवर्जून टाळावाआणि थायरॉईडला आळा घालावा आयोडीन युक्त मीठ खावे असे सांगितले. याप्रसंगी सहाय्यक डॉ अंकिता फुलझेले यांनी थायरॉईड संबंधित माहिती पीपीटी द्वारा दिली. व्याख्यानानंतर प्रेक्षकांनी विचारलेल्या शंकांचे निरसन डॉ. ममता मुळे यांनी केले महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील सर्व स्टाफ यांच्या आरोग्यासाठी हे व्याख्यान निश्चितच उपयोगी पडेल असे अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ सुनिता बाजपाई मॅडम यांनी सांगितले .कार्यक्रमाचे आभार प्रगटन आरोग्यवर्धिनी समिती प्रमुख डॉ रमा दुधमांडे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शीला जिरे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. राम गायकवाड यांची तिफण संपादक मंडळावर निवड

छत्रपती संभाजीनगर (शिवाजी गायकवाड) : कन्नड सारख्या ग्रामीण व दुर्गम भागातून प्रसिद्ध होणारे, भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफणने सोळाव्या वर्षात पदार्पण केले आहे. तिफणचे आजपर्यंत अनेक महत्वाचे विशेषांक प्रसिद्ध झालेले आहेत. तिफणच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. दर दोन ते तीन वर्षात तिफण संपादक मंडळाची पुनर्रचना करण्यात येते. आजपर्यंत अनेकांना संपादक मंडळावर संधी मिळाली आहे. २०२५-२०२७ या दोन वर्षासाठी तिफण संपादक मंडळावर सदस्य म्हणून दैनिक लोकमत, दिव्य मराठी, पुण्यनगरी, देशदूत , एकमत आदी दैनिकांत संपादकीय मुद्रितशोधक पदावर प्रदीर्घ काळ योगदान दिलेले प्रा. डॉ. राम मच्छिंद्र गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, भारतीय तसेच विदेशी भाषा संस्था, एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे ते कार्यरत आहेत, यांची निवड करण्यात आली आहे. विविध नियतकालिकातून सातत्याने भाषा, साहित्य या अनुषंगाने लेखन करतात.

साहित्य, समाज, संस्कृती, लेखनकौशल्ये, उपयोजित मराठी मुद्रितशोधन हा त्यांच्या संशोधनाचा व चिंतनाचा विषय आहे. मराठी भाषा आणि संशोधन क्षेत्रात त्यांचे महत्वाचे योगदान आहे. गत अनेक वर्षांपासून मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख अभ्यासक्रम देणे आणि विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

## तात्याराव चव्हाण यांच्या "भावतरंग" काव्यसंग्रहास डॉ. आंबेडकर पुरस्कार जाहीर



छत्रपती संभाजीनगर : पुरोगामी सामाजिक, सांस्कृतिक महासंघ आणि पार्वती प्रतिष्ठाण सामाजिक जनकल्याण संस्था छ.संभाजीनगर आयोजित परिवर्तनवादी दुसरे साहित्य संमेलन दि.२९ मार्च शनिवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज नागसेनवन येथे संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा ऋषीकेश कांबळे, प्रमुख पाहुणे मा अंकुशराव कदम, संयोजक मा समाधान दहिवाळ तर, पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा सूर्यकांता गाडे या असणार आहे. कवी तात्याराव चव्हाण कचनेरकर यांच्या "भावतरंग" या काव्यग्रंथाला या संमेलनात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. तात्याराव चव्हाण यांच्या "संघर्षाचं सोनं" या पहिल्या साहित्य कृतीला पंधरा पुरस्कार मिळालेले आहे. तर भावतरंग या काव्य ग्रंथाला यापूर्वी राज्यस्तरीय काव्यरत्न पुरस्कार मिळाला आहे. या काव्य संग्रहात नैतिक मूल्यांची रुजवणूक होण्याच्या दृष्टीकोनातुन समर्पक काव्य रचना करण्यात आल्या आहेत. या पुरस्काराबद्दल श्री के एम फसाटे, सी एम रमणे, गणेश राठोड, हारदे, शिंदे, केदारे, बढे, घुगे, गोर्डे, बोरुडे, पाटील, नलावडे सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ मार्च २०२५

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेत साठ जणांची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत कन्नड तालुक्यातील ६० लाभार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते यांच्या दालनात सोडत पध्दतीने एकुण ९१ हे ०१ आर (२१२ एकर २६ गुंठे) जमीन वाटप करण्यात आली. सदरील जमीन ही अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेषेखालील भुमिहिन कुटूंबाना १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेषेखालील भुमिहिन कुटूंब सन २०२१-२२ पासुन लाभ मिळण्याच्या प्रतिक्षेत होते. सदरील जमीन समाज कल्याण विभागाने सन २०२२-२३, २०२३-२४ व चालु वर्षात खरेदी करुन लाभार्थ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी पुढाकार घेतला. दि. २६ मार्च रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील दालनात उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसिलदार प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी संदीप सिरसाठ, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक सीमा सिंदीकर यांच्या उपस्थितीत नीदा नवीद खान (वय ५ वर्षे) वर्ष या मुलीच्या हस्ते सोडत पध्दतीने चिठ्या काढुन मौ.माळेगांव लोखंडी, माळेगांव ठोकळ, वासडी, पळशी बु, नादरपुर व गौरपिंपरी या ठिकाणच्या जमीनी प्रति लाभार्थी चार एकर (कोरडवाहु) प्रमाणे निवड करण्यात आली. सदरील ६० लाभार्थ्यांच्या आदेशासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हास्तरीय समितीकडे अंतीम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. जिल्हाधिकारी संभाजीनगर यांच्या आदेशान्वये सदरील लाभार्थ्यांना सातबारा उतारा मिळेल.

यावेळी महसुल सहाय्यक जीवन चव्हाण, समन्वयक अभिजित पानट, मंडळ अधिकारी विकास वाघ, तलाठी संगीता सुर्यवंशी, तलाठी एस ए बावस्कर, शिरस्तेदार आनंद शिंदे, तलाठी एस.डी. विसपुते, ग्राम विकास अधिकारी के. एस. थोरात, ग्रामसेवक एस.एस. गोसावी आदींनी परिश्रम घेतले यावेळी लाभार्थी उपस्थित होते.

## मीरा बोरणकरांचा आदर्श घेऊन स्नेहल हार्दे झाली पीएसआय



**कन्नड (अरुण थोरात) :** धडाकेबाज आयपीएस पोलीस अधिकारी मीरा बोरणकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत केसापूर ता. कन्नड येथील शेतकरी कन्या कु. स्नेहल चंद्रकांत हार्दे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग च्या पोलीस उपनिरीक्षक परिक्षेत मुली मध्ये राज्यातून चौथा क्रमांक मिळविला आहे. त्याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक होत आहे, स्नेहल हार्दे ला बालपणा पासूनच खेळाची आवड होती. शेतात झाडांना दोरी बांधून त्यावर ती ऊंच उडी चा सराव करीत. शालेय शिक्षण गावातील जि.प. शाळेत व माध्यमिक शिक्षण देवगाव रंगारी तर महाविद्यालयीन शिक्षण संभाजीनगर येथे घेतले, महाविद्यालयीन जीवनात तीने अनेक राज्य, राष्ट्रीय पातळीवरील क्रिडा स्पर्धांत भाग घेत पदके पटकाविली, स्नेहल चे वडील चंद्रकांत हार्दे शेतकरी तर आई अंगणवाडी सेविका आहेत. प्रतिकुल परिस्थिती वर मात करीत त्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिले, मुलगा मनोज हार्दे यांनी इंजिनिअरींग चे शिक्षण पूर्ण करुण एमपीएससी परिक्षेत यश मिळविले सध्या ते जालना महानगर पालिकेत कर अधिकारी म्हणून कार्यरत आहे. तर भावजायी प्रियंका तुपे हार्दे या ही जालना येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. धडाकेबाज पोलीस अधिकारी मीरा बोरणकर या छ.संभाजीनगर येथे आल्या असतांना स्नेहल ने त्यांची कामगिरी पाहिली, आपण ही अशेच धडाकेबाज पोलीस अधिकारी व्हावे असे स्वप्न बाळगून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अनेक स्पर्धा परिक्षांचा सराव केला. विशेष म्हणजे जिल्हा निवड समिती ने घेतलेल्या तलाठी परिक्षेत ही तीने विशेष प्रावीण्य मिळविले. आणि थोड्याच दिवसात लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परिक्षेत तीने मुलींत राज्यातून चौथा क्रमांक मिळविला आहे. याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मराठा आरक्षण कायदेशीर व घटनात्मक तरतुदींचे पीपीटी सादरीकरण लवकरच, मुख्यमंत्री स्वत: पहाणार !



**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षण चिंतन आंदोलनातील मागण्या प्रमाणे आरक्षण विषयातील कायदेशीर व घटनात्मक बाबी त्याचप्रमाणे मराठवाड्यातील मराठा समाजाला खुप पूर्वीच प्रदान केलेल्याआरक्षणाची तात्काळ आंमलबजावणी करून जात प्रमाणपत्र त्वरीत देण्याचे शासनादेश निर्गमित करावेत,सारथी संस्थेच्या वतीने नोंदणी दिनांका पासुन फेलोशीप व विविध कृतिशील कार्यक्रमाचे नियोजन,स्व. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या बाबत " मागेल त्याला कर्ज " या संकल्पनेतून कर्जाची मंजुरी यासाठी पतपुरवठा थेट स्व.आण्णा साहेब पाटील महामंडळास अधिकार देणे व फायनान्शीयल इन्स्टिट्युट म्हणून दर्जा द्यावा बहाल करणे, विवीध आंदोलना मध्ये सहभागी झालेल्या आंदोलकां वरील राज्यभारातील सर्वच गुन्हे तात्काळ मागे घेणे,जिल्हा निहाय वस्तीगृह, डॉ.पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजनेची प्रलंबित रक्कम अदा करणे,सरपंच स्व:संतोष देशमुख यांच्या निर्घुण हत्या प्रकरणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहभागी असणाऱ्या सर्वच मारेकऱ्यांवर नव्याने करण्यात आलेल्या बी एन एस व इतर कायद्या तील तरतुदी नुसार अधिकचे दोषारोप पत्र व गुन्हे दाखल करून त्यांना फाशीची शिक्षा होण्याइतपत पुरावे दाखल करणे,परभणीतील स्व.सोमनाथ सूर्यवंशी यांचे हत्येस कारणीभूत असणाऱ्या सर्वच प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करने व यांना फाशीची शिक्षा होण्या इतपतचे पुरावे दाखल करने, नियोजीत " मराठा क्रांती सुर्य स्व.अण्णासाहेब जावळे पाटील " यांच्या नावाने स्थापन झालेले मराठवाडा आर्थिक विकास महामंडळास किमान 500 कोटीची भरीव आर्थिक निधीची तरतुद खास बाब म्हणुन करणे असा संकलप आहे.

विशेष बाब म्हणजे आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी तयार केलेलं अभ्यासु पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनचे सादरीकरण च्या कायदेशीर व घटनात्मक बाबींची सुची म्हणजे ' ब्रिफ नोट 'सादरीकरण करण्याची तारीख निश्चीत करण्या पूर्वीची पूर्वतयारी बैठकीत पत्र देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत ज्यांचा परिश्रमातून आरक्षणाचा विषय मुख्यमंत्री यांचे समक्ष पोहचला ते जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोबत उपोषणकर्ते रमेश केरे पाटील,मुख्य समन्वयक रविंद्र काळे पाटील व इतर मान्यवर दिसत आहे. लवकरच सदरचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादरीकरण शासनाच्या लिगल टीम समक्ष करण्याची वेळ निश्चीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी प्रशासनास दिले असुन सोबत मराठा आरक्षणा बाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या क्युरेटिव्ह पीटिशन साठी जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत अभ्यासु व उपयुक्त असे न्याय निवाडे विवीध घटनापीठाचे निर्णय यांचे पुरावे संकलन केलेले " पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन " तयार केलेले असुन त्याचे सादरीकरण मुख्यमंत्री त्यांचे सहकारी मंत्रीगण आणि राज्य शासनाची "लीगल टीम" यांचे समक्ष होणार असल्याची माहिती मुख्य समन्वयक रविंद्र काळे पाटील यांनी एका पत्रका द्वारे माध्यमांना दिली आहे.

सदरचे चिंतन आंदोलन यशस्वी होण्यासाठी चिंतन समितीचे रविंद्र काळे पाटील,निलेश डव्हले, शैलेश भिसे,संतोष काळे,लक्ष्मण शिरसाठ, राहुल पाटील,विलास मालुसरे,हेमंत कर्डीले,मोती वाघ,गणेश थोरात, शैलेश चौहान,महेश मोरे,अनिल कुटे,संकेत शेटे,पुंडलीक पाटेकर, अमोल गायकवाड,राजु कुकलारे, रावसाहेब आळंदकर, पांडुरंग भुसारे,विकास बनसोडे, सुशील पायाळ,आप्पासाहेब जाधव,मनिष जोगदंडे,राजेश लांडगे, अनिल केरे,विद्यार्थी योगेश बहादुरे, नाथराव खंदारे, सुरज सोळुंके,नामदेव बागल, उध्दव सोळंके,डॉ.परमेश्वर माने,गोपाल घेगडे राहुल शिंदे,नागेश शिंदे,शुभम केरे,प्रताप पवार,एकनाथ कदम,उमेश अंडिल,अमोल धांडरे आदी मान्यवरां सह विजया मराठे, पुजा वाघ,निर्मला वाघ,सुमन सुर्यवंशी, भारती पवार,मंदा गायकवाड, लता काळे, रेखा गाडेकर,नीता पाटील, अर्चना मोहिते या सह अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले होते.